म.वि.प्र.समाजाचे,

# कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय उत्तमनगर, सिडको, नाशिक

# राष्ट्रीय सेवा योजना २०२१-२०२२

## विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर अहवाल

## दि.२५/१/२०२२

विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर अहवाल पहिल्या दिवशी सकाळ सत्रात उदघाटन करून शिबिराची सुरुवात करण्यात आली. उद्घाटन कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून मा.श्री. पुंडलिक नाना थेटे, माजी संचालक, म.वि.प्र.समाज नाशिक प्रमुख अतिथी/उद्घाटक म्हणून मा.श्री. सचिनजी पिंगळे, संचालक, म.वि.प्र.समाज, नाशिक, गावाचे सरपंच श्रीमती अलकाताई दिवे, कार्यक्रमासाठी उपसरपंच श्रीमती छबाबाई थेटे, सदस्य महेंद्र थेटे मंजुलाताई गायकर ग्रामस्थ आत्माराम थेटे, महविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.जे.डी.सोनखासकर, मुख्याधापक श्री.तासकर सर, स्टाफ सेक्रेटरी प्रा.एस.टी. घुले, सकाळसत्र प्रमुख प्रा. राजेश झनकर आदी उपस्थित होते.







कार्यक्रमाचे प्रास्ताविक सिडको महविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.जे.डी.सोनखासकर यांनी केले. मा.श्री. सचिनजी पिंगळे यांनी आपले अध्यक्षीय भाषण करत सर्वांना मार्गदर्शन केले. सातपूर महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी डॉ.रविंद्र आहिरे यांनी सर्वांचे आभार मानत कार्यक्रमाची सांगता केली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कार्यक्रम अधिकारी प्रा.श्रीमती वर्षा शिरोरे, प्रा. शुभम गव्हाणे यांनी प्रयत्न केले.

दुपारच्या सत्रात शिबिरार्थी विद्यार्थ्यांना शिबिराची रूपरेषा सांगून शिबिरातील कामकाजाचे नियोजन करून विद्यार्थ्यांचे गट तयार करण्यात आले.

## दि: २६/१/२०२२

शिबिराच्या दुसऱ्या दिवशी सकाळी नियमित पद्धतीने प्रार्थना घेण्यात आली त्या विद्यापीठ गीत, रा.से.यो. गीत, इतर प्रार्थना घेण्यात आल्या. सिडको महाविद्यालयाच्या इतिहास विभागाच्या वतीने गिरणारे गावचे इतिहास लेखन करण्यासाठी प्रा. डीम्बर सर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व्हे करण्यात आला.







दुपारच्या सत्रात प्रमुख वक्ते म्हणून आलेल्या मा.श्री. पुंडलिक नाना थेटे, माजी संचालक, म.वि.प्र.समाज नाशिक यांनी गिरी कंदरी गिरणारे या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. तसेच या सिडको महाविद्यालयाचे स्टाफ सेक्रेटरी प्रा. एस.टी.घुले यांनी एन एस एस व युवक याविषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले.







## दि. २७/१/२०२२

शिबिरातील तिसऱ्या दिवशी नियमित प्रमाणे प्रार्थना घेऊन श्रमादानाला सुरुवात करण्यात आली. गिरणारे येथील केबीएच विद्यालय येथील संपूर्ण परिसराची स्वच्छता स्वयंसेवकाकडून करण्यात आली. सिडको महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागाच्या वतीने  यांनी गावातील आर्थिक व सामाजिक सर्व्हे करण्यात आला.







दुपारच्या सत्रात व्याख्याते म्हणून आलेल्या सिडको महाविद्यालयाच्या भूगोल विभाग प्रमुख प्रा.सिताराम निकम यांनी पर्यावरण संवर्धन विषयावर तसेच डॉ. भास्कर ढोके भाषा व संवाद कौशल्य याविषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले.

## दि. २८/१/२०२२

शिबिरातील तिसऱ्या दिवशी नियमित प्रमाणे प्रार्थना घेऊन श्रमादानाला सुरुवात करण्यात आली. गिरणारे येथील ऐतिहासिक बारव याची स्वच्छता करण्यात आली तसेच गावातील स्मशान भूमीची स्वच्छता करण्यात आली. सिडको महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागाच्या वतीने गावातील लोकांच्या कुटुंबांचे आर्थिक सर्वेक्षण करण्यात आले तसेच सिडको महाविद्यालयाच्या वनस्पती विभागाच्या वतीने गावातील जैविविधतेचे सर्वेक्षण करण्यात आले.








दुपारच्या सत्रात व्याख्याते म्हणून के बी एच विद्यालायचे वरिष्ठ शिक्षक श्री. मोरे सर यांनी उपस्थितांना **'स्वातंत्र्याचा अमृत महोस्तव प्रसंगी कर्मवीरांचे योगदान'** या विषयावर मार्गदर्शन केले.

## दि. २९/१/२०२२

शिबिरातील पाचव्या दिवशी नियमित प्रमाणे प्रार्थना घेऊन गिरणारे येथील खंडेराव महाराज टेकडी परिसराची स्वच्छता करण्यात आली. सिडको महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ.साधना पाटील यांनी उपस्थितांना **'आर्थिक व सामाजिक सर्व्हे'** या विषयावर मार्गदर्शन केले तसेच सिडको महाविद्यालयाच्या सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ.मनिषा गिरासे **'निरोगी आरोग्य'** व प्राणीशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ.मयुरा पाटील यांनी **उन्नत भारत अभियान** या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. याच दिवशी सिडको महाविद्यालयाच्या सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या वतीने गावातील ग्रामस्थांसाठी **मोफत डायबिटीस व शुगर तपासणी शिबीर** ठेवण्यात आले होते. त्याचा लाभ ग्रामस्थांनी घेतला







दुपारच्या सत्रात व्याख्याते गिरणारे आश्रम शाळेचे प्रमुख ह भ प श्री नवनाथमहाराज थेटे **'संस्कार काळाची गरज '** या विषयावर उत्तम असे व्याख्यान देऊन उपस्थिताना मार्गदर्शन केले. तसेच विभाग समन्वयक डॉ.गोरक्षनाथ पिंगळे यांनी शिबिरास भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## दि. ३०/१/२०२२

शिबिरातील सहाव्या दिवशी नियमित प्रमाणे प्रार्थना घेऊन श्रमादानाला सुरुवात करण्यात आली. महात्मा गांधी पुण्यतिथी निमित्ताने प्रतिमेचे पूजन व दोन मिनिटे मौन पाळण्यात आले. त्यानंतर गिरणारे येथील मरेथोन चौकातील स्वच्छता करण्यात आली.तसेच पथनाट्याची रंगीत तालीम घेण्यात आली.







दुपारच्या सत्रात व्याख्याते म्हणून सकाळसत्र प्रमुख प्रा. राजेश झनकर व प्रा. रविराज वटणे यांनी **'युवकांची नैतिक सामाजिक जबाबदारी'** या विषयावर उत्तम असे व्याख्यान देऊन उपस्थिताना मार्गदर्शन केले.

## दि. ३१/१/२०२२

विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराच्या शेवटच्या दिवशी नियमित प्रमाणे प्रार्थना झाल्यानंतर समर्थ भारत अभियानाची सुरुवात करण्यात आली अभियानांतर्गत गाव हद्दीतील परिसरामध्ये रॅली काढण्यात आली. त्या वेगवेगळ्या घोषणा देत स्वयंसेवकांनी विविध सामाजिक विषयावर जनजागृती करण्याचा प्रयत्न केला तसेच गावहद्दीतील मातोश्री नगर व राजवाडा परिसरात सिडको महाविद्यालयाच्या वतीने पथनाट्य, सातपूर महाविद्यालयाच्या वतीने देशभक्तीपर मुकनाट्य सदर करण्यात आले विविध सामजिक विषयावरील भारुड सदर करण्यात आले.







दुपारच्या सत्रात शिबिराचा समारोप संपन्न झाला त्या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा.श्री. पुंडलिक नाना थेटे, माजी संचालक, म.वि.प्र.समाज, नाशिक, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.सोपान

कुशारे, सरपंच श्रीमती अलकाताई दिवे, हभप नवनाथमहाराज थेटे, मुख्याधापक श्री.तासकर सर, स्टाफ सेक्रेटरी प्रा.एस.टी. घुले, सकाळसत्र प्रमुख प्रा. राजेश झनकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा. एस.टी.घुले यांनी तर प्रास्ताविक डॉ. रविंद्र आहिरे यांनी केले स्वयंसेवकामधून महाविद्यालयाच्या स्वयंसेवक यांनी आपले अनुभव व्यक्त केले.प्रमुख पाहुण्यांनी आपले मार्गदर्शन केल्यानंतर ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने मुख्याधापक श्री.तासकर सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले व शिबिरात झालेल्या कामाचा लेखाजोखा मांडला. अध्यक्षीय भाषणात नानासाहेब महाले यांनी सर्वाना मार्गदर्शन केले. कार्यक्रम अधिकारी प्रा. शुभम गव्हाणे यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रम संपन्न केला.







कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कार्यक्रम अधिकारी प्रा.श्रीमती वर्षा शिरोरे यांनी प्रयत्न केले. सातदिवसीय विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर उत्तमरीत्या व यशस्वीपणे पूर्ण केले. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.जे.डी.सोनखासकर यांचे मार्गदर्शन लाभले.

**(डॉ. रविंद्र आहिरे )**
**कार्यक्रम अधिकारी**

**(डॉ.जे.डी.सोनखासकर)**
**प्राचार्या**